# जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

## शिक्षण विभाग (प्राथमिक)

**संपर्क क्र.** - 02362- 228774 / 228770 / 228866 / 228496

जिल्हा परिषद मुख्य प्रशासकिय इमारत,पहिला मजला,ओरोस (मुख्यालय) सिंधुदुर्गनगरी ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग.

Email - eoprisind@gmail.com / ssasindhudurg@gmail.com


महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब, ऑक्टोबर 11, 20011 /अश्विन 19, शके 1933 मधील तरतुदीनुसार

**नमुना दोन**

ग्राम :- ओरोस, सिंधुदुर्गनगरी.

दूरध्वनी :- 02362 228770

ई मेल :- eoprisind@gmail.com

जावक क्र. :- जा.क्र.जिप/शिक्षण/प्राथ/आ.1/348/2022

शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सिंधुदुर्गनगरी, जिल्हा - सिंधुदुर्ग

**शाळा मान्यता क्रमांक** –S.F. 27330311201 **दिनांक :** 28/04/2022.

व्यवस्थापक :- **पोदार इंटरनॅशनल स्कुल मु.पो.ता कणकवली,जिल्हा-सिंधुदुर्ग.**

**विषय :- बालकांचा मोफत वं सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, 2011 याच्या नियम 11, पोट नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्यात येत असलेबाबत.**

संदर्भ :- 1. आपल्या शाळेकडील प्राप्त सुधारीत प्रस्तावानुसार व गशिअ यांच्या शिफारसीचे पत्र दिनांक 27/04/ 2022 नुसार.

2. दिनांक 06/08/2021 रोजी दिलेली RTE शाळा मान्यता.

महोदय / महोदया,

आपल्या दिनांक-02/08/2021 च्या अर्जाच्या व दिनांक 27/04/2022 संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती कणकवली यांनी शाळेची केलेली तपासणी व त्याचप्रमाणे त्यांनी दिलेल्या अहवालाच्याआधारे मी श्री महेश धोत्रे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद सिंधुदुर्ग दिनांक 06 ऑगस्ट 2021 पासून दिनांक 07 ऑगस्ट 2024 पर्यंत **तीन वर्षाच्या कालावधीसाठी** इयत्ता 1ली ते इयत्ता 8 वी करीता **पोदार इंटरनॅशनल स्कुल कणकवली जिल्हा सिंधुदुर्ग** (शाळेचे नाव, पत्यासह) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.**

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा, पालन करील.
3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल. परंतू आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालंकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपुर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5. संस्था / शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

   (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

   (दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षण किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

Swati Kanase
Principal Podar International School
Kankavli,Maharashtra

Col Shirish P Kulkarni (Retd)
General Manager
Podar Group of School
Kolhapur HUB Region

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही. (चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. ( परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल. )

(सात) अधिनियमाच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.

(आठ) शिक्षकांने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

7. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.
8. शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
9. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.
10. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या.

**खालील भौतिक सुविधांची तपासणी RTE Act 2009 मधील तरतुदी व शाळांमध्ये मुलभूत सुविधाबाबतचे निकष ठरविणेबाबतचा महाराष्ट्र शासनाचा शा.नि. दि.29 जुन 2013 नुसार करण्यात आलेली आहे.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शाळेचे नांव | | **पोदार इंटरनॅशनल स्कुल कणकवली जिल्हा सिंधुदुर्ग** | | |
| शाळेचे माध्यम | | इंग्रजी **UDISE Number- 27330311201** | | |
| शाळेचा प्रकार | | स्वयं अर्थ सहाय्यित | | |
| शाळेचा अभ्यासक्रम | | सीबीएसई | | |
| शाळेच्या इयत्ता | | 1 ली व 8 वी | | |
| शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | | 6023 चौ.मी. | | |
| **क्र** | **भौतिक सुविधा** | **उपलब्धता** | **आवश्यकता** | **त्रुटी** |
| 1 | एकूण बांधकाम क्षेत्र | 2835.67 चौ.मी | | |
| 2 | खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | 2230 चौ.मी | किमान 648 चौ.मी व कमाल 2000 चौ.मी कमाल | |
| 3 | वर्गखोल्यांची संख्या | 15 | प्रत्येक वर्गासाठी | |
| 4 | एक वर्ग खोली | 22X18 चौ.फुट | 499 स्क्वेअर फिट 30 मुलांमागे 1 मागे एक | |
| 5 | कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली | आहे. | असणे आवश्यक | |
| 6 | **मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.** | 8 मुलांसाठी<br>8 मुलींसाठी | 60 – 1( 2 मु. 1 शौ)<br>60 ते 120– 1( 3 मु. 1 शौ) 120 > 30 वि. 1 extra Uri.& 100 वि.1 toi. (B &G ) | |
| 7 | पिण्याच्या पाण्याची सुविधा | आहे. | नळ जोडणी व कायम स्वरुपाची किंवा पिंप माठ यामध्ये साठवणुकीची व्यवस्था असावी. | |
| 8 | दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर. | 1 | | आवश्यकता नाही |
| 9 | अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रीडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता वाचन साहित्य विनासायास उपलब्ध | आहेत | असावे | |
| 10 | CWSN शौचालय | आहे .सोबत फोटो जोडलेला आहे. | विशेष गरजा असणाऱ्या (cwsn) मुलां-मुलींसाठी एकत्रित असलेल्या शौचालयामध्ये कमोड पध्दतीचे भांडे,हॅंडरेल तसेच रॅम्पची व्यवस्था असावी. | |
| 11 | संरक्षक भिंत (आवार भिंत) | आहे.सोबत फोटो जोडलेला आहे. | पक्की/तारेचे/काटयांचे व झाडे असावी. | |

Swati Kanase
Principal Podar International School
Kankavli,Maharashtra

Col Shirish P Kulkarni (Retd)
General Manager
Podar Group of School
Kolhapur HUB Region

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12 | अग्नीशमन यंत्रे | आहे.सोबत फोटो जोडलेला आहे. | प्रत्येक शाळेत किमान दोन,किंवा प्रत्येक वर्गासाठी एक याप्रमाणे | |
| 13 | प्रथमोपचार पेटी | आहे.सोबत फोटो जोडलेला आहे. | शाळेसाठी एक असावी | |
| **क्र** | **भौतिक सुविधा** | **उपलब्धता** | **आवश्यकता** | **त्रुटी** |
| 14 | उताराचा रस्ता ( रॅम्प ) | आहे-सोबत फोटो जोडलेला आहे. | 1 .2 रुंदी व 2फुट कठडे(Hand rail) असावे. | |
| 15 | शाळा मान्यता | आहे | प्रत असावी | |
| 16 | प्रथम मान्यता | आहे | प्रत असावी | |
| 17 | वर्ग व तुकडी वाढीस मान्यता आहे का ? | आहे (1 ली व 2 री साठी आहे) | प्रत असावी | |
| 18 | संस्था रजिस्ट्रेशन | आहे | प्रत असावी | |
| 19 | मागील तीन वर्षातील एकुण उत्पन्न व खर्च किंवा तुट | नविन शाळा | उल्लेख असावा व त्यासंबधी ऑडीट रिपोर्ट प्रती जोडणे. | |
| 20 | RTE 25 % प्रवेशाबाबत फी, प्रवेश व खर्च अहवाल | खात्री करावी. | माहिती पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक. | |
| 21 | विदयार्थी आधार कार्ड | 100 %नाही | सरल पोर्टलवर नोंदणी 100% टक्के असणे आवश्यक | |
| 22 | वर्गनिहाय अभ्यासक्रमाचा आणि पाठय क्रमाचा तपशिल | जोडलेला आहे | तपशिल जोडणे आवश्यक | |
| 23 | विदयार्थ्यांची मुल्यमापन पध्दत | आकारीक व संकलित | सा.पु.स.मू.प. (cce) | |

वरील माहिती ही आपण सादर केलेल्या प्रस्तावातील माहिती व गटशिक्षणाधिकारी किंवा त्यांचे क्षेत्रिय अधिकारी यांनी तपासलेली आहे.त्यांचा अहवालानुसार आपणास सदर RTE शाळा मान्यता देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.वरील माहिती मध्ये तफावत आढळल्यास आपली ही RTE शाळा मान्यता रदद करण्यात येवून आपल्या शाळेवर किंवा संस्थेवर योग्य ती प्रशासकिय कारवाई करण्यात येईल.

11. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.
12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
13. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
15. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावी.
16. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता सांकेतांक S.F.27330311201 असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा याची नोंद घ्यावी.
17. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी. किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
18. संस्थेच्या नोंदणी बाबत किंवा संस्थेच्या नोंदणीच्या कागदपत्रांमध्ये तसेच घटना व ध्येय,उददीष्टे यामध्ये काही बदल असल्यास नूतनीकरण किंवा बदल केल्याची वेळोवेळी सुनिश्चित करावी.
19. RTE Act मध्ये दिलेले, शासनाने शाळेबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या व महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क अधिनियम यामधील सर्व नियम, कायदे तरतूदींची पूर्तता आपली शाळा करित नसल्याचे आढळून आल्यास शाळा कारवाईस पात्र राहील.

(महेश धोत्रे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

Swati Kanase
Principal Podar International School
Kankavli,Maharashtra

Col Shirish P Kulkarni (Retd)
General Manager
Podar Group of School
Kolhapur HUB Region